## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०५/२०१८

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०५/२०१८ चे १३.०० यातील आरोपी हे शिक्षण म्हणुन नौकरीस असतांना आरोपी क्र. १ यास पिडीत फिर्यादी ही भिन्न जातीची असुन ती अल्पवयीन आहे असे माहीत असुन सुध्दा त्यांनी पिडीत फिर्यादीस आपले मोटार सायकलवर बसवुन एम.एसी सि. आय.टी. चे ॲडमिशन करिता लाखनी येथे आणुन कॅम्पुटरमध्ये न नेता आरोपी क्र. २ चे घरी नेवुन आरोपी क्र. १ व २ मिळुन आळीपाळीने लैगींक अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखणी येथे कलम ३७६(२)(फ)),३७६(ड),५०६ भादवी. सहकलम ४,१० बा.लै.अ.प्रती.कायदा २०१२ आरडब्लु ३(२)अ.जा.ज.अ.प्र.का १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) सोन्याचे दागीणे व मोबाईलची चोरी :–**

दिनांक ०५/०५/२०१८ चे १५.३० ते १६.३० वाजता दरम्यान यातील अनोळखी आरोपी ईसम याने फिर्यादीचे घराचे मागील दाराची संकल उघडुन आत प्रवेश करुन माचघरातील लाकडी आलमारीचे ड्रॉप मध्ये ठेवलेले १२,२००/–रु. पर्स मधील ७०८०/–रु. व डब्यात ठेवलेली कारल्या मन्याची सोन्याची पोत वजन १० ग्रॅम, ४ ग्रॅम सोन्याची अंगठी, कार्बन कंपनीचा मोबाईल असा एकुण ४८,०८०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी पाडुरंग सोमा दाने वय ६६ वर्ष, रा. चिचाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४५४,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**३) शासकीय आधारभुत योजने अंतर्गत तांदुळ भारतीय खादय निगमला जमा न करता शासना सोबत विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद . :–**

सन २०११,२०१२ पासुन आज पर्यत यातील फिर्यादी गणेश तुकाराम खर्चे वय ३८ वर्ष, रा. जिल्हा पनन अधिकारी भंडारा हे शासनाचे अधिकारी यांचे सोबत सन २०११–२०१२ या वित्तीय वर्षात यातील आरोपीने कब्ज्यातील सुंदर राईस मिल मध्ये शासकीय आधारभुत धान खरेदी योजने अंतर्गत शासनाचे निर्णया नुसार दिनांक महा. स्टेट कॉ. ऑफ मारकेटींग फेडरेशन लि. मुंबई राज्य शासणाने फिर्यादी अभिकर्ता यांचे सोबत धान भरडाईचा करारनामा करुन आरोपीने करारनाम्या प्रमाणे तांदुळ भारतीय खादय निगमाला ८०८.६५ क्विन्टल जमा केले आणि उर्वरीत १३१०.६९ क्विंटल तांदळ जमा न करता परस्पर विल्हेवाट लावुन २५,३८,७८०/–रु. चा माल अपहार करुन शासना सोबत विश्वासघात करुन फसवणुक केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४०३,४०७,४०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गभणे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) शासकीय मालाची नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/०५/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ग्रा. पं. लिपीक हे ग्रा. पं. कार्यालय आंधळगाव येथे कार्यालयीन काम करीत असतांना आरोपी हा ग्रा. पं. कार्यालय येथे येवुन माझ्या वार्डात रोडाला लागुन असलेला गवत सफाई कामगारा कडुन का काढुन घेतला नाही या कारणा वरुन रागाचे भरात ग्रा. पं. कार्यालयातील २ ठेवलेल्या खुर्च्या तोडुन १,०००/–रु. ची शासकीय मालाची नुकसान केल्याने फिर्यादी अरुण रुपंचद बुराडे वय ५९ वर्ष, रा आंधळगाव यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३(२) सार्वजनीक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनीयम १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे चार जखमी :–**

दिनांक ०५/०५/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ जी ६७५५ चे चालक व त्याची पत्नी व २ मुलीस जखी करण्यास कारणीभुत झाल्याने अंबर रामु बारादवने वय ३९ वर्ष, रा. लोहारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भादवी. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

**अ**) दिनांक ०५/०५/२०१८ चे १३.३० ते १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो श्रीराम भवन तुमसर येथे सार्वजनीक ठिकाणी उभा करुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पो.ना.दिलीप धावड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब**) दिनांक ०५/०५/२०१८ चे १८.००वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन नविन बसस्टॉप समोर श्रीराम नगर तुमसर येथे सार्वजनीक ठिकाणी उभा करुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनि. उबाळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**७ ) विषारी औषध प्राशन करुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०५/०५/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुधाकर सखाराम फंदे वय ४५ वर्ष, रा. सोमलवाडा याने शेतीकरीता सोसायटीचा कर्ज घेतला होता व मुलीचे लग्ना साठी हात उसने पैसे घेंतले होते, सततच्या नापीकी मुळे कर्ज कसे फेडले जाईल या चिंतेने मृतकाने स्वत:हाचे शेतात मोनोसिल नावाची किटक नाशक औशधी प्राशन करुन मरण पावल्याने फिर्यादी नेमीचंद भाऊजी फंदे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. आडे पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**८) अवैध हातभट्‌टी व देशी दारु/ जुगार अडड्‌यांवर धाडी . :—**

दिनांक ०५/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, गोबरवाही, साकोली, लाखनी, पालांदुर व जवाहरनगर येथे अवैध हातभट्‌टी व देशी दारू/ जुगार अडड्‌यावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४३० लिटर हातभंट्‌टी दारू + ४,४५० किलो सडवा पासा+ साहीत्य किंमती १,९७,६७०/—रु. ७ लिटर ४७० मिली देशी दारु किंमती २०९०/रु. तसेच जुगारातुन किंमती २२,५००/—रु. असा एकुण किंमती २,२२,२६०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०५/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक— ०८ तीन सिटर वाहनाकरीता— ०४ ईतर वाहनांवरती — ९७ केसेस करण्यात आले आहे.

**(सपोनि. एच. एन. रायपुरे)**
**पोलीस नियत्रंण कक्ष**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र.९९७०७३२०७९**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.